# बर्णबा उदारपणे देणारा

## येशू ज्याच्यावर आमचे प्रेम आहे, त्याने आम्हांला उदारहस्ते देण्याची आज्ञा केली

मुलांना शिकवणाऱ्यांनी **G1b** हा अभ्यासक्रम वाचावा

**प्रार्थना:** ''हे स्वर्गीय पित्या, तू आपला पुत्र येशू आणि सार्वकालिक जीवन आम्हांला दिले आमच्या आनंदासाठी तू सर्व प्रकारच्या चांगल्या गोष्टी आम्हांला दिल्यास तू दिलेल्या चांगल्या देणग्या गरजू लोकांबरोबर वाटून घेण्यास, त्यांना त्यात सहभागी करुन घेण्यासाठी कृपा करुन मला व माझ्या मंडळीला सहाय्य कर.''

1. **उदारपणे देण्याकरीता आपल्या अंत: करणाची तयारी करा आणि आपल्या मंडळीलाही तसेच करायला शिकवा**

बर्णबा आणि आरंभीच्या ख्रिस्ती लोकांनी उदारपणे दान दिले.

- **प्रे. कृ. 2:44-45** ह्या वचनांत आरंभीच्या विश्वासणाऱ्यांनी गरजा पूर्ण करण्यासाठी कशा प्रकारे दान दिले ते /शोधा.

  अ) कोणत्या विश्वासणाऱ्यांनी दिले?

  ब) त्यांनी कोणाला दिले?

  *(उत्तरे: अ) ज्यांच्याकडे देण्यासारखे होते अशा सर्वांनी दिले ब) सर्व गरजूंना दिले)*

- **प्रे. कृ. 4:32-37** ह्या वचनांमध्ये बर्णबाने गरजू विश्वासणाऱ्यांच्या मदतीसाठी कशा प्रकारे दान दिले ते शोधा

  अ) त्याच्याकाडे विकण्यासारखे काय होते?

  ब) त्याने कोणाला दान दिले?

  *(उत्तरे: अ) जमीन ब) गरजूंना देण्यासाठी प्रेषितांकडे दिले.)*

- **प्रे. कृ. 11:28-30** ह्या वचनांमध्ये उपासकांनी इतरांना गरजेच्यावेळी कशा प्रकारे मदत केली ते शोधा.

  अ) विश्वासणाऱ्यांनी किती दिले?

  ब) त्यांनी दान कोणाला दिले?

  *(उत्तरे: अ) त्यांना शक्य होते ते, यथाशक्ती त्यांनी दिले. ब) यहूदीयांत राहणाऱ्या गरजू विश्वासणाऱ्यांना दिले)*

देव दान देणाऱ्यांना/ अभिवचने देतो, ती

- **नीती 19:17** ह्या वचनात शोधा:

  अ) आम्ही कोणाला द्यावे?

  ब) देवाने कोणते अभिवचन दिले?

  *(उत्तरे: अ) गरीबांना ब) आम्ही जे देतो त्याची फेड प्रभु करील)*

- **लूक 6:30-38** ह्या वचनांतून शोधा:

  अ) आम्ही कोणाला द्यावे?

  ब) देवाने कोणते अभिवचन दिले?

  *(उत्तरे: अ) आमच्याकडे मागतात त्या सर्वांना ब) ज्या मापाने देऊ त्याच मापाने आम्हांला परत दिल जाईल)*

- **2 करिथ 9:1-11** ह्या वचनांत शोधा:

  अ) आम्ही कोणाला द्यावे?

ब) आम्ही किती द्यावे?

क) देवाने कोणते अभिवचन दिले?

ड) दान देताना आम्हांला काय वाटले पाहिजे?

*(उत्तरे: अ) गरजू ख्रिस्ती लोकांना. ब) आम्ही आपल्या मनात ठरविले असेल त्याप्रमाणे दयावे. क) देण्यासाठी आमच्याकडे नेहमीच विपुल असेल. ड) आनंद)*

- **फिलिपै 4:13-19** ह्या वचनांत शोधा:

  अ) आम्ही कोणाला द्यावे?

  ब) देव कोणते अभिवचन देतो?

  *(उत्तरे: अ) नवीन मंडळ्या सुरु करणाऱ्या प्रेषितांना ब) आमच्या सर्व गरजा देव पुरवून देईल)*

- **मत्तय 6:19-21** मध्ये शोधा आम्ही आमची ठेव कोठे ठेवावी.

- **मत्तय 6:31-33** मध्ये शोधा आम्ही प्रथम कशाचा शोध केला पाहिजे.



**2. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करुन येणाऱ्या आठवडयासाठीच्या तुमच्या कामाची योजना करा.**

- विश्वासणारे कदाचित दान देतील अशा तुमच्या मंडळीतील सदस्यांच्या व इतरांच्या गरजा समजून घ्या.
- गरजु लोकांची भेट घ्या आणि विश्वासणाऱ्यांनी दिलेल्या देणग्या त्यांना देऊन आशीर्वाद द्या. प्रथम मंडळीमधील गरजूंना मदत करुन सुरुवात करा आणि मग इतरांनाही मदत करा, गलती 6:10
- मंडळीकडून मिळालेली आणि तिने वितरीत केलेल्या आर्थिक देणग्यांची नोंद ठेवण्यासाठी हिशेब लिहिण्याची पद्धत सुरू करा
- गरजूंना मदत करण्याची त्यांची काळजी घेण्याची जबाबदारी मंडळीतील उपआचार्य व स्त्री सेविकांवर सोपवून द्या, प्रे. कृ. 6:1-6

**3. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करुन येणाऱ्या उपासना सभेसाठी योजना करा.**

बर्णबाने गरजू लोकांना कशा प्रकारे मदत केली हे सविस्तर सांगा किंवा त्या प्रसंगाचे नाटयकरण करा, प्रे. कृ. 4:32-37

पापांची क्षमा करण्यात आलेल्या स्त्रीने येशूबद्दलचे प्रेम कशा प्रकारे व्यक्त केले ते सविस्तर सांगा किंवा त्याचे नाटयकरण करा, लूका 7:36-50

एका गरीब विधवेने आपल्या कमाईतून कशा प्रकारे सर्व काही देवाला दिले ही घटना तपशीलाने सांगा किंवा ती नाटयकरणाने सांगा, मार्क 12:38-44 अथवा मुलांना ह्या वृत्तांताचे नाटयकरण करण्यास सांगा आणि त्यांनी तयार केलेले प्रश्न प्रौढांना मोठया लोकांना विचारा.

**पाठ करा नीती 19:17**

एखादी तातडीची गरज पूर्ण करावयाची असल्यास दानार्पण घ्या:

देवाने आम्हांला महान देणगी दिलेली आहे. त्या विषयीची पवित्र शास्त्रातील वचने विश्वासणाऱ्यांना वाचायला किंवा म्हणायला सांगा. योहान 3:16-17; योहान 6:47-51; 1 योहान 3:16-17; रोम 6:23.

प्रभुभोजनाचा परिचय ओळख करुन देण्यासाठी 2 इतिहास 35:17-19 वाचा आपण वल्हांडणाचा सण साजरा करतो आणि देवाने यज्ञपशूच्या ठिकाणी आपली देणगी, येशू 'देवाचा कोकरा' याची योजना केली हे स्पष्ट करुन तपशीलाने सांगा.

## देणे आणि घेणे या विषयी प्रोत्साहन देणारी पवित्र शास्त्रातील वचने

| | |
|---|---|
| 1 इतिहास 29:9-13 | लूक 7:36-50; 14:12-14 |
| 1 करिंथ 16:1-4 | मत्तय 6:19-21; 6:31-33; 19:28-30; 24:34-35 |
| 1 योहान 3:16-19 | फिलिप्पै 4:13-19 |
| 1 तीमथ्य 5:3-5 | नीती 11:24-28; 19:17; 21:13; 22:9; 28:27 |
| 2 करिंथ 9:7-8 | स्तोत्र 39:4-7 |
| प्रे. कृ. 11:28-30; 20:32-35 | रोम 10:13-15; 15:20-25 |
| याकोब 2:14-16 | अनुवाद 8:15-19; 15:7-11 |

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net